I J R S S I S, Spl Issue (III), July-2020 : 68-74 e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal Original Article

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES

© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# "कोरोना विषाणूच्या प्रभावोत्तर भारतीय समाजावर झालेला परिणाम"

सचिन पंढरी खेडकर
डा. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर
*Corresponding Author: skhedkar27@gmail.com

**गोषवारा**

विषाणूच्या प्रभावोत्तर भारतीय समाजातील महत्वपूर्ण सामाजिक-सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, वैद्यकीय इ. क्षेत्रात प्रभाव पडलेला आहे. व त्याचा परिणाम मात्र भारतीय समाजावर पडलेला दिसून येतो.

**सूचनक शब्द:** कोरोना विषाणू, प्रभावित क्षेत्र, इंटरनेटचा वापर.

## प्रस्तावना:

कोरोना या विषाणूने झालेल्या मारीला जागतिक आरोग्य संघटनेने(1,2) महामारी म्हणून घोषित केले आहे. कोरोना हा विषाणू आकाराने अतिशय सुक्ष्म असून त्याचा आकार हा कंदमुळ गोल कणासारखा आहे. कोरोनाची सर्वसामान्य लक्षणे म्हणजे ताप, थकवा व कोरडा खोकला व ज्या रूग्णांना सुरूवातीपासूनच काही आजार असतील अशा व्यक्तिंना वेदना, अनुनासिक रक्तसंचय, वाहणारे नाक, घसा खवखवणे किंवा अनिसार होवू शकतो. संक्रमण झालेल्या व्यक्तीला साधारणतः दोन ते चैदा दिवसात याचे लक्षणे दिसतात. हा आजार संसर्गजन्य आहे. एका व्यक्तिच्या संपर्कातून दुस-याला होत असतो. या आजाराचा संक्रमण झालेल्या एकुण रूग्णांपैकी 80 टक्के रूग्ण हे उपचार न घेता बरे होत असतात. याचा मृत्यूदर हा कोरोना होणा-या रूग्णांमध्ये 6 पैकी 1 रूग्ण हा गंभीर आजारी पडतो. यामध्ये उच्च रक्तदाब, दमा, वयोवृदध व्यक्ती हृदयरोग किंवा मधुमेह इ. मुलभूत आजार असलेल्या व्यक्ति हे गंभीर आजारी पडू शकतात. त्यामुळेच यातील काही लक्षणे दिसताच घरी लपून न बसता वैद्यकीय अधिका-याकडून उपचार व सल्ला घेणे आवश्यक असते. इ.स. 1960 च्या दशकात याचा प्रादूर्भाव झाला होता. परंतू त्यावेळेस या आजाराचा तेवढा प्रभाव न दिसून आल्याने तसेच सर्दी व खोकला ही त्याची प्राथमिक लक्षणे असल्याकारणाने त्याचा चिकीत्सक अभ्यास अभ्यास हा गंभीरपणाने घेतल्या गेलेला नव्हता व

हा आजार नंतर एवढी आराजक्ता माजवेल याची कल्पनाही केली नव्हती. परंतू चिन मधील वुहान या षहरातून या रोगाचा जन्म झाला असून सर्वत्र जगभरात त्याचा प्रसार झालेला दिसून येतो. दि. 31 मे 2020 पर्यंत संपूर्ण जगभरात 61,54,028 कोरोना रूग्ण

त्यातील 3,70,893 रूग्णांचा मृत्यू त्यानंतर भारतात एकूण लोकसंख्येपैकी 1,81,827 कोरोना रूग्ण त्यात 5,185 रूग्णांचा मृत्यू तसेच महाराश्ट्रात एकूण 62,228 कोरोना रूग्ण त्यात 2,098 रूग्णांचा आतापर्यंत मृत्यू झालेला आहे. एवढी भयानक परिस्थीती कोरोना या आजाराने केली आहे. हा आजार दिवसेंदिवस वाढतचं आहे. या आजाराच्या लसीवर मात्र सर्वच देश अयशस्वी ठरले आहेत.

कोरोना आजार हा एकाच नाण्याच्या दोन बाजू दशर्वविणारा आहे. त्यातील सकारात्मक बाजू ही पर्यावरणीय दृष्टीकोनातून चांगली आहे. उदा. ओझोनचा थर, गंगा नदी इ. आणि नकरात्मक बाजू म्हणजेच आपल्या संशोधनाचा मुख्य हेतू आहे. आणि यामुंळे भारतीय समाजातील प्रमुख क्षेत्रांवर (समाजिक-सांस्कृतिक, आर्थिक वैदयकीय, शैक्षणिक व राजकीय) कसा फटका बसलेला आहे हे आपल्याला सदर संशोधनातून दिसून येतो.

**ई-सर्व्हेक्षणचं का ?**

अद्यावत स्थितीत कोरोनाचे संकट एवढे वाढत आहे की, फिल्ड सर्व्हेेक्षण करणे शक्य नाही. परंतू संगणक (इंटरनेट) सारख्या प्रभावी माध्यमाच्या आधारे त्याचा अभ्यास करणे शक्य आहे. म्हणून ई-सर्व्हेक्षणाचा वापर करण्यात आला.

**संशोधनाची गरजः**

कोरोनाच्या संकटाने भारतीय समाजाला एवढे विळख्यात टाकले की, लोकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच काही व्यक्ती हे मानसिक रोगातून बळी पडत आहे परंतू या सकंटातून बाहेर पडण्यासाठी सदर संशोधनाच्या माध्यमातून काही शिफारशी सुचविता येतात त्यामुळे त्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

**संशोधन पदधतीः-**

**सर्व्हेक्षणाचे उदिदष्टे:** कोरोना विषाणूच्या प्रभावित क्षेत्राचा अभ्यास करणे व त्याचे निष्कर्ष काढून शिफारशी सुचविणे.

**नमुना तंत्र:** सदर संशोधनाला संभाव्यवता नमुना निवड पदधती या तंत्राचा वापर केला आहे.

**नमुना निवड:** सदर संशोधनासाठी 500 व्यक्तींची नमुना म्हणून निवड केली आहे.

**समावेषक निकष:** या संशोधनात सामान्यपणे 18 वर्षावरील व्यक्तींचाचं समावेश केला आहे.

**अपवर्जन निकष:** या संशोधनासाठी 18 वर्षाखालील व्यक्तींना अपात्र ठरवीले आहे.

**नैतीक परवानगी:** माहिती संकलनासाठी व्यक्तींच्या परवानीनेच सर्व्हेक्षण करण्यात आले आहे.

**अभ्यास तंत्र:** सदर संशोधन प्रश्नावली या तंत्राचा वापर करून गुगल फार्मच्या आधारावर करण्यात आले.

**संशोधनाची प्रक्रीया:** कोणत्याही संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी त्याची एक प्रक्रीया असते. म्हणून सदर संशोधनासाठी संशोधकासहित 7 लोकांचा एक व्हाॅटसअॅप ग्रुप तयार करण्यात आला. त्याच्या आधारावर सदर संशोधन विषयाच्या संदर्भात माहिती गोळा करण्यात आली. त्या माहितीचे संकलन करून त्याची पायलट चाचणी व्दारे विश्लेषण करण्यात आले.

**कोरोना विशाणूच्या प्रभावीत झालेली भारतीय क्षेत्रे:-**

- समाजिक-सांस्कृतिक
- आर्थिक
- वैद्यकीय
- शैक्षणिक

कोरोना आजाराच्या संकटात अनेक क्षेत्राला याचा फटका बसलेला आहे. जणूकाही भारतीय समाजाला ते समोर आव्हानचं आहे. यात आरोग्य व वैदयकीय सुविधा, शिक्षण, अर्थव्यवस्था, शेती, राजकारण, सामाजिक इ. अनेक क्षेत्राला या संकटाचे आव्हानंच आहे. इ. माहितीच्या संदर्भातील मिळालेल्या आकडयानुसार ही क्षेत्रे अति, मध्यम व जास्त प्रभावीत क्षेत्रामध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे

- **समाजिक-सांस्कृतिक**

सध्या काही ठिकाणी हा आजार पसरत आहे. तिथे एका विशिष्ट धर्माला कारणीभूत मानले जात आहे. त्यामुळे धार्मिक तिव्रता वाढण्याची शक्यता देखील वर्तवली जाते. देशातील ब-याच भागांसोबत आदिवासी(1,6) भागात देखील शहरातून येणा-या लोकांना गावात प्रवेश दिला जात नाही. प्रवेश रोखण्यासाठी गावाच्या प्रवेशाच्या वाटीवर झाडे-काटे, दगड टाकण्यात आलेले आहेत. आदिवासी भागात अंधश्रदधा या पूर्वीपासूनच आहेत. त्या भागात भगता म्हणजेच गावाचा पुजारी यांच्या सांगण्यावरून संकटातून वाचण्यासाठी बळी देणे आवश्यक आहे किंवा एखादया संशयीत व्यक्तीला गावाबाहेर काढण्याचे प्रकार होतात. या आजाराच्या बाबतीत देखील उलट-सुलट चर्चांमुळे काही भागात असे प्रकार आढळून आले. परंतू शासन यावर समाज जागृती करण्याचा प्रयत्न करीत आहे व ते शक्य होत आहे. यावरून असे लक्षात येते की, माहितीच्या विश्लेषणानुसार हा मध्यम प्रभावीत क्षेत्र आहे

- **आर्थिक**

सध्या भारतीय अर्थव्यवस्थेची(1,5) असणारी स्थिती आणि कोरोनाच संकट अत्यंत बिकट परिस्थितीला जन्म घालेल. लोकांना काही दिवसानंतर जर रोजगार भेटला नाही तर कोरोनापेक्षा उपासमारीने जीव गेल्याचे घटना समोर येतील येत आहेत. आपल्याला पुतळयांपेक्षा

कुठल्याही नेत्यासाठी केलेल्या इव्हेंटपेक्षा हाॅस्पिटले, सर्वांना घरे, शिक्षण आणि अन्न अशा प्राथमिक गरजेच्या गोष्टींकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. खेळत्या पैशाच्या अभावाने बाजारात आलेला स्थूलपणा आणि त्यातून वाढलेली बेरोजगारी, बॅंकेनी दिलेली कर्जाउ रक्कम परत न आल्यामुळे बॅंकांचे निघालेले दिवाळे, शेअर मार्केटमधील उतार तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील रूपयाची घसरणारी किंमत जीडीपीची सातत्याने होणारी घसरण इ. सर्व गोष्टींमुळे नोटाबंदीनंतर सातत्याने आपण पाहतोय सध्याची भारतीय अर्थव्यवस्था दृष्ट चक्रामध्ये सापडलेली आहे. ज्यामुळे लोकांच्या हातात कामधंदा नाही, पैसे नाहीत बॅंक बचत ठेवी नाहीत. नेमक्या या परिस्थितीत कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे हतबलता वाढत चाललेली आहे. या सगळयाचा सारासार विचार करणे केंद्र शासन व राज्य शासनाला करणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातून शहरांमध्ये रोजगारासाठी स्थलांतरित झालेला मोठा वर्ग आहे. सरकारने लाॅकडाऊनचा निर्णय घेतांना तेवढाच विचार करायला पाहिजे होता जेवढा विचार बाहेर देशातून येणा-या प्रवाशांच्या बाबतीत केला. लाॅकडाऊनच्या काळामध्ये पंतप्रधानाच्या माध्यमाने दोन चमत्कार पहायला मिळाले होते त्यात दिवे लावणे, टाळया वाजवणे इ. याचा काय वैज्ञानिक आधार आहे हे मला अजूनही समजले नाही; परंतू त्यात कोरोना वाॅर्रीअस साठी टाळया वाजविण्याचा संकल्प अगदी बरोबर वाटते. या माध्यमातून लोकांना वाटले की, आता कोरोना पळून जाईल; पण तो काही पळाला नाही मात्र या संभ्रमाचा परिणाम मात्र लोकांवर झाला आहे. ग्राहकाच्या वर्तणुकीसंदर्भातील सिदधांतानुसार आपल्याला सध्याची परिस्थिती सांगता येईल की, सध्या जीवनाश्यक गोष्टींची मागणी वाढत आहे. त्यामुळे ठराविक काळाने या वस्तूंचा तुटवडा बाजारात निर्माण होईल आणि यामुळे या वस्तूच्या किमतीमध्ये वाढ होईल. तसेच जास्त नफा कमविण्यासाठी वस्तूंवरील नफेखोरी आणि मक्तेदारी देखील वाढेल. हे सध्या फक्त अत्यंत आवश्यक गोष्टींसाठी असे होउ शकते. सध्या साॅनिटायझर, साबण, मास्क, औषधे आणि अन्नधान्य यांना जास्त मागणी आहे. त्यामुळे यांच्या किमंतीमध्ये सहाजीकच वाढ होईल आणि साठे बाजार करून माल विकला जाईल. जर समझा असे झाले तर वर उल्लेख केलेल्या सर्वसाधारण वर्गातील लोकांचे काय होईल? त्यांच्याकडे पैसे नसतील तर ते या बाजारचे ग्राहक होउ शकणार नाहीत. पैशासाठी त्यांना कामाची आवश्यकता लागेल. जर संपूर्ण देश या संकटात जास्त काळ लांबला तर बेराजगारीचा प्रश्न देखील भारतीय समाजासमोर आव्हानांत्मकाचं असेल.

यावरून असे लक्षात येते की, हा अतिशय प्रभावीत क्षेत्र आहे.

- **वैद्यकीय**

सध्या भारतामध्ये एकूण उपलब्ध असणा-या डाॅक्टरांची(1,2) संख्या, बेडची संख्या तसेच व्हेंटिलेटर, मास्क आणि इतर अत्याधुनिक उपकरणे ही भारताच्या एकूण लोकसंख्येपेक्षा खूपच कमी आहे. तसेच रूग्ण तपासाच्या वेळी लागणा-या साधनसामुग्रीचा तुटवडा असल्याने डाॅक्टर्स, नर्स, पोलिस आणि इतर जे लोक पायाभूत प्राथमिक जबाबदारीने काम करत आहेत त्यांनासुदधा थेटपणे संसर्ग होण्याचा धोका आहे. कोरोनाशी लढण्यासाठी आतापर्यंत पंतप्रधानांनी 15 हजार कोटी रू. ची घोषणा केली आहे. भारतासारख्या मोठया 135 कोटी लोकसंख्येच्या विकसनशील देशासाठी ही रक्कम म्हणजे खूपच कमी आहे. परंतू भारतात कोरोनामुक्त होण्याचा दर हा 50 टक्यापेक्षाही जास्त असल्यामुळे वैद्यकीय क्षेत्रात सरकार अद्यावत तरी प्रयत्नशील आहे. यावरून असे लक्षात येते की, हा मध्यम प्रभावीत क्षेत्र आहे

- **शैक्षणिक**

कोरोनाचा सर्वात मोठा फटका शैक्षणिक(3,4) क्षेत्रातही पडला आहे. लाॅकडाऊनचा पहिला फटका विद्याथ्र्यांच्या परीक्षांवर झाला त्यानंतर शासनाच्या वाढत्या लाॅकडाऊनमुळे परीक्षा रदद, निकाल, नविन शैक्षणिक सत्र इ. सर्व घटकांवर या आजाराचा चांगलाच फटका बसला त्यातल्या त्यात शासनाने आॅनलाईनही शिक्षण सुरू करण्याचे ठरविले परंतु आदिवासी व ग्रामीण भागात इंटरनेट, मोबाईलच्या सोई नसल्यामुळे विद्याथ्र्यांचे शैक्षणिक सत्र सुरू करता येत नाही. परंतू शालेय शिक्षण व उच्च तंत्र शिक्षण विभागाकडून अभ्यास कमी करून किंवा विविध माध्यम उपलब्ध करून देण्याचे पर्याय शासनाकडे उपलब्ध आहे. यारून असे लक्षात येते की, हा कमी प्रभावीत क्षेत्र आहे.

**निष्कर्ष:-**

- कोरोनामुळे भारतीय समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्राला आळा बसलेला आहे. परंतू शासनाच्या समाज जागृतीच्या माध्यमातून हे शक्य दिसत आहे. त्यामुळे हा कमी प्रभावीत क्षेत्र आहे
- कोरोनामुळे भारतीय समाजाची अर्थव्यवस्था धोक्यात आलेली आहे. सरकारच्या लाॅकडाउनसारखा मोठा निर्णय झाल्यानंतर याला पर्याय नाही आणि म्हणूनच हा जासृत प्रभावित क्षेत्र आहे.
- कोरोनाच्या संकटामध्ये भारतातील वैद्यकीय क्षेत्र अकार्यक्षम आहे. परंतू कोरोनामुक्त होण्याचा दर हा

50 टक्यापेक्षा जास्त असल्यामुळे हा क्षेत्र मध्यम प्रभावीत असलेला दिसून येतो.

- कोरोनाच्या संकटात विद्याथ्र्यांचे भविष्य धोक्यात आहे.परंतू शासनाला यांवर अनेक पर्याय शोधता येणे शक्य असल्यामुळे हा कमी प्रभावीत क्षेत्र आहे.

दिवसंेदिवस कोरोनासारखे आजार भविष्यात येतीलच तेव्हा याचा पळ न काढता या संकटाचा सामना करण्यासाठी काही शिफारशी या संशोधनाच्या माध्यमातून सांगता येतील.

**शिफारशी:-**

- शासनाने वेळोवेळी सांगत असलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे. यातच भारताचे विद्यमान पंतप्रधान श्री. मा. नरेंद्र मोदी यांनी लोकांना आत्मनिर्भरतेचा सुत्र सांगीतलेला आहे हे लक्षात ठेवावे.
- अंधश्रदधेचा प्रभाव असलेल्या आदिवासी व ग्रामीण भागात शासनाकडून सामाजिक जागृती घडवून आणावी.
- भारतीय अर्थव्यवस्थेची स्थिती अनुकूल ठेवण्यासाठी त्यासंदर्भातील सर्व घटकांना नियंमानुसार सुट देण्यात यावी.
- जीवनाश्यक वस्तूंचा तुटवडा होणार नाही यासाठी शासनाने वेळोवेळी लोकांना सुचना दयावी.
- या आजाराची अजूनही लस उपलब्ध नसल्यामुळे शासनाने सुचविलेल्या नियमांचे व आत्मनिर्भता या सुत्राचे काटेकोरपणे पालन करावे.
- भारतामध्ये महाराष्ट्र व केरळ या राज्यांमध्ये जे प्रतिबंधात्मक उपाय सुरू आहेत. त्याचा प्रत्येक राज्यांमध्ये अमलंबजावणी करावी.
- आतापर्यंत आपण फक्त सांगत होतो की, हे वैज्ञानिक युग आहे. आज खरी वेळ आली ते दाखविण्याची त्याचा वापर करा. मग ते शैैक्षणिक, सामाजिक, आर्थिक इ. कोणतेही क्षेत्र असतील.
- केरळमध्ये सोशल डिस्टंगसाठी तेथील लोक छ़त्रीचा वापर करत आहेत. ते प्रत्येक राज्यात आवश्यक करावे.

सदर संशोधनाच्या माध्यमातून असे लक्षात आले की, कोरोनासारखे भारतीय समाजापूढे कोणतेही संकट येतील अशावेळी या संकटांना तोंड देण्यासाठी आपल्यामध्ये बळ निर्माण करणे आवश्यक आहे, काळाची गरज आहे. तसेच सरकार आपल्या स्तरावर प्रयत्न करीत असला तरी या संकटामध्ये आपल्यालाही भारतीय समाजाचा महत्वाचा नागरीक म्हणून काही गोष्टींची दक्षता घ्यायची आहे. कारण याशिवाय

कोरोनाला मात करण्यासाठी दुसरा उपाय नाही हेच या संशोधनाचे मुख्य उदिदष्ट आहे.

**REFERENCES**

Brian McCloskey. Mass gathering events and reducing further global spread of COVID-19: a political and public health dilemma. The Lancet 2020;395(10230):https://doi.org /10.1016/S0140-6736 (20)30681-4 (accessed 04 April, 2020).

WHO. Coronavirus disease (COVID-19)

outbreak.2020.https://www.who.int/e mergencies/diseases/n ovel coronavirus 2019 (accessed March 17, 2020).

All India Survey on Higher Education, accessed 03 April 2020.

Board Examination 2020: Over 1 Crore Students appeared for 12th , Entrancezone.com, Abhinandan Singh, 13 March 2020.

Irons, John (2009), " Economics Scarring: The long term impacts of the recession"Economics Policy Institute (EPI) Washington, D.C., available at https:// www.epi.org/publication/bp243 /

Newman M. Zainal N. The value of maintaining Social connections for mental health in older people. Lancet Public Health: Jan 2020 retrieved from https://www.thelancet.com/j ournals /lanpub/article/PHS2468-2667(19)30253-1/fulltext

Richard Armitage March 19,2020 COVID-19 and the consequences of isolating the elderly retrieved from https://doi.org/10.1016/S24 68-2667(20)30061-X